# मराठा समन्वयकांकडून बीड बंद मागे

## अजित पवारांचा जिल्हा दौरा, पंकजा मुंडे-धनंजय मुंडेही उपस्थित

**बीड–** मारहाण आणि गुन्हेगारी टोळींच्या व्हिडिओने गाजत असलेल्या बीडमध्ये पुन्हा एकदा जबर मारहाणीची घटना घडली आहे. शिवराज दिवटे या युवकास वाल्मिक कराडच्या टोळीतील पोरांनी मारहाण केल्यामुळे पुन्हा एकदा बीडच्या गुन्हेगारीचा मुद्दा राज्यात चर्चेत आला आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनीही याबाबत पोलीस अधीक्षकांशी बोलणी केली असून आता स्वत: अजित पवार बीड दौऱ्यावर जात आहेत. अजित पवार यांच्या उपस्थितीत उद्या तीर्थक्षेत्र विकास योजनेची आढावा बैठक होणार असून मंत्री पंकजा मुंडेही या बैठकीला उपस्थित असणार आहेत. अजित पवार आज बीड जिल्हा दौऱ्यावर असून येथील विविध विकास कामांची परळीत पाहणी करणार आहेत. दरम्यान, मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांकडून आज बीड बंदची हाक देण्यात आली होती. मात्र, मनोज जरांगे पाटील यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर हा बंद मागे घेण्यात आल्याची माहिती मराठा समन्वयकांकडून देण्यात आली आहे. मात्र, अजित पवारांच्या दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अजित पवार यांच्या उपस्थितीत उद्या ज्योतिर्लिंग स्थान असलेल्या वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा तसेच परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यासंदर्भात शासकीय विश्रामगृह येथे बैठक होणार आहे. या बैठकीसाठी मंत्री पंकजा मुंडे,आमदार धनंजय मुंडे हे देखील उपस्थित असणार आहेत. या बैठकीआधी अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे,धनंजय मुंडे हे वैद्यनाथाचे दर्शन घेऊन तदनंतर तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी करतील. त्यामध्ये मंदिराच्या पूर्व द्वारासमोर असलेली दगडी कमान क्यू कॉम्प्लेक्स हरिहर तीर्थ, साऊंड अँड लाईट शोची जागा, प्रदक्षिणा मार्ग, मेरू गिरी उद्यान ही कामे केली जात आहेत.या कामांची ते पाहणी करणार असून परळीतल्या बैठकीनंतर ते अंबाजोगाईकडे रवाना होणार आहेत.

बीड जिल्ह्यातील शिवराज दिवटे मारहाण प्रकरणाच्या निषेधार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. मात्र, उद्या होणारा बंद स्थगित करण्यात आला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि सर्व समाज बांधवांशी चर्चा करून आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाणार असल्याने बीड जिल्हा बंद मागे घेण्यात आल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चा समन्वयकांनी दिली. त्यामुळे, बीड जिल्ह्यात आज कुठलाही बंद पाळण्यात येणार नाही.

# रशियाने युक्रेनवर २७३ ड्रोन डागले; ३ वर्षातील सर्वात मोठा ड्रोन हल्ला

**क्विव–** शनिवारी रात्री रशियाने २७३ ड्रोनने युक्रेनवर हल्ला केला. युक्रेनियन हवाई दलाच्या म्हणण्यानुसार, तीन वर्षांच्या युद्धात रशियाचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला होता.

या हल्ल्यात २८ वर्षीय युक्रेनियन महिलेचा मृत्यू झाला, तर एका मुलासह तीन जण जखमी झाले. युक्रेनियन संसदेचे अध्यक्ष रुस्लान स्टेफनचुक यांच्या मते, हल्ल्यामुळे ९ तास हवाई सायरन वाजत राहिले. या हल्ल्यात निवासी इमारतींचे नुकसान झाल्याचे रुस्लान म्हणाले. तसेच अनेक गॅरेज जळून खाक झाले आहेत.

रशिया-युक्रेन युद्धाचे कारण नष्ट करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे, असे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी रविवारी सांगितले. एएफपीच्या वृत्तानुसार, पुतिन यांनी रशियन सरकारी माध्यमांशी बोलताना हे विधान केले.



रशिया आणि युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी पहिली चर्चा १६ मे रोजी तुर्कीतील इस्तंबूल येथे झाली. या बैठकीला दोन्ही देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तुर्कीने या बैठकीची मध्यस्थी केली. हे संभाषण फक्त ९० मिनिटे चालले.

युद्ध थांबवण्याबाबत दोन्ही देशांमध्ये कोणताही करार झाला नाही. युक्रेनियन अधिकाऱ्याच्या मते, चर्चेसाठी एक अट किमान तात्पुरती युद्धबंदी होती, जी रशियाने स्वीकारण्यास नकार दिला. रशिया आणि युक्रेनमधील युद्ध फेब्रुवारी २०२२ पासून सुरू आहे. गेल्या ३ वर्षात पहिल्यांदाच दोन्ही देशांमध्ये शांततेबाबत थेट चर्चा झाली.

युक्रेनियन शिष्टमंडळाचे नेतृत्व संरक्षण मंत्री रुस्तम उमरोव यांनी केले आणि रशियन शिष्टमंडळाचे नेतृत्व पुतिन यांचे सहयोगी व्लादिमीर मेंडिन्स्की यांनी केले.युक्रेनियन शिष्टमंडळाचे नेतृत्व संरक्षण मंत्री रुस्तम उमरोव यांनी केले आणि रशियन शिष्टमंडळाचे नेतृत्व पुतिन यांचे सहयोगी व्लादिमीर मेंडिन्स्की यांनी केले.

**पुतिन यांनी चर्चेत भाग घेण्यास नकार दिला**

यापूर्वी झेलेन्स्की आणि पुतिन शांतता चर्चेत सहभागी होतील याबद्दल चर्चा झाली होती, पण गुरुवारी क्रेमलिनने सांगितले की पुतिन त्यात सहभागी होणार नाहीत.

तुम्हाला आवडो किंवा न आवडो, मी आणि पुतिन एकत्र येईपर्यंत काहीही होणार नाही असे मला वाटत नाही, पुतिन यांनी शांतता चर्चेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतल्यानंतर ट्रम्प म्हणाले. पण आपल्याला हे सोडवावे लागेल कारण खूप लोक मरत आहेत.

तथापि, क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह म्हणाले की, येत्या काळात पुतिन यांची ट्रम्प यांना भेटण्याची कोणतीही योजना नाही.

चर्चेपूर्वी, झेलेन्स्की यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की युक्रेन सध्या रशियाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रांना रशियाचा भाग म्हणून कधीही स्वीकारणार नाही. त्यांनी असेही म्हटले की शांतता चर्चा पुढे जाईल, परंतु युक्रेन आपल्या भूमीवर तडजोड करणार नाही. ही जमीन युक्रेनची आहे आणि ती नेहमीच युक्रेनची राहील.

युक्रेन आणि क्रिमियाच्या चार प्रदेशांना रशियाचा भाग म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी रशियाने वारंवार केली आहे. २०१४ मध्ये रशियाने क्रिमियावर कब्जा केला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने यापूर्वीच संकेत दिले होते की युक्रेनला त्याचे सर्व पूर्वीचे प्रदेश परत मिळू शकणार नाहीत.

# भुजबळ यांच्याकडे खंडणी मागणाऱ्याच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**नाशिक–** आयकर विभागाचा अधिकारी असल्याचा बनाव करून, माजी मंत्री आणि विद्यमान आमदार छगन भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक संतोष गायकवाड यांच्याकडे १ कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला, नाशिक गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ च्या पथकाने करंजाळी येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून रंगेहाथ अटक केली आहे.

स्वीय सहाय्यक संतोष गायकवाड यांच्या मोबाईलवर अज्ञात क्रमांकावरून वारंवार फोन येत होते. कॉल करणारा व्यक्ती स्वतःला आयकर विभागाचा अधिकारी असल्याचे सांगत होता आणि त्र्यंबकेश्वर येथील फार्महाऊसवर छापा टाकण्यात येणार असल्याची धमकी देत मदतीच्या मोबदल्यात १ कोटी रुपये मागत होता. पैसे न दिल्यास कारवाई करण्यात येईल, अशी धमकीही त्याने दिली.

ही माहिती गायकवाड यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना दिल्यानंतर, पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव यांनी कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला. गायकवाड यांना गुजरातमधील धरमपूर येथे बोलावून आरोपीला पैसे देण्यासाठी तयार राहण्यास सांगण्यात आले. पोलिसांनी डमी नोटा आणि काही खरी रक्कम पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत आरोपीकडे देण्याचे ठरवले.

धरमपूर येथे आरोपी येईल, अशी अपेक्षा होती, मात्र तो न आल्यामुळे पथक परतत असताना आरोपीने पुन्हा संपर्क साधून करंजाळी येथील ङ्गहॉटेल रितम व्हॅलीफ येथे येण्यास सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा रचून संशयित आरोपी राहुल दिलीप भुसारे (वय २७, रा. करंजाळी, ता. पेठ) याला रंगेहाथ अटक केली.

त्याच्याकडून होंडा शाईन मोटारसायकल, मोबाईल फोन, ५०० रुपयांच्या ६० खऱ्या नोटा, तसेच बनावट (खेळण्याच्या) नोटांचे १५ बंडल - एकूण सुमारे ८५,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मुंबई विमानतळावर ग्राउंड हँडलिंग आता ही नवीन कंपनी सांभाळणार; उशश्रशलळ चे सर्व कर्मचारी नव्या कंपनीत होणार समाविष्ट

याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अंबड पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव आणि सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# तब्बल ३ किलो वजनाचा आंबा



**दिग्गज नेते शरद पवार यांची दत्ता घाडगे यांनी भेट घेतली आणि त्यांनी तब्बल तीन किलो वजनाचा आंबा भेट दिला.**

# कैलास मानसरोवर यात्रेला जूनपासून सुरूवात

**नवी दिल्ली–** कैलास मानसरोवर यात्रा यावर्षी जूनपासून नाथुला मार्गाने पुन्हा सुरू होणार आहे. २०१७ मध्ये डोकलाम गतिरोध आणि कोविड-१९ महामारीमुळे ही यात्रा पाच वर्षांपर्यंत थांबवण्यात आली होती. सिक्कीममधील भारत-चीन सीमेजवळ अंतिम तयारी जोरात सुरू आहे, ज्यात मूलभूत सुविधांचा बांधकाम कार्य जवळपास पूर्ण होण्याच्या टप्प्यावर आहे. बांधकाम कामांचे प्रमुख सुनील कुमार यांच्या मते, अनुकूलन केंद्रांचा जीर्णोद्धार आणि पुर्ननिर्माण पुढील चार ते पाच दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.



सुनील कुमार यांनी सांगितले की, कैलास मानसरोवर यात्रा लवकरच सुरू होणार आहे. अनुकूलन केंद्रांचे जीर्णोद्धार आणि पुनर्निर्माण पुढील चार ते पाच दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. मार्गावर अनुकूलन केंद्रे उभी केली जात आहेत. या अनुकूलन केंद्रांमध्ये एकूण ५०-६० लोक राहणार आहेत. मार्गाच्या कडेला दोन अनुकूलन केंद्रे तयार केली जात आहेत - एक १६व्या मैलावर (१०,००० फूट उंचीवर) आणि दुसरे कुपुप रोडवर (१४,००० फूट उंचीवर) हंगू तलावाजवळ.

प्रत्येक केंद्रात दोन पाच-शय्या आणि दोन दोन-शय्या असलेल्या इमारती असतील, तसेच तीर्थयात्रिकांसाठी वैद्यकीय केंद्र, कार्यालय, स्वयंपाकघर आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध असतील. स्थानिक रहिवासी आणि २०१६ मध्ये या यात्रेत सहभागी झालेल्या आयके रसैली यांनी या रुटच्या पुन्हा सुरू होण्याचे स्वागत केले आहे. त्यांनी सांगितले की पर्यटन पुन्हा सुरू होईल आणि स्थानिक जीवनमानात सुधारणा होईल. सिक्कीम मार्ग त्याच्या उत्तम रस्त्यांच्या कनेक्टिव्हिटीमुळे सर्वात सुरक्षित आणि सुलभ मार्ग म्हणून ओळखला जातो.

# इथेनॉल आयातीवरील बंदी उठवण्याच्या अमेरिकेच्या विनंतीचा भारताकडून आढावा

**नवी दिल्ली–** इथेनॉल आयातीवरील बंदी उठवण्याच्या अमेरिकेच्या विनंतीचा भारत आढावा घेत आहे. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या लोकांच्या मते, दक्षिण आशियाई देशाने पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी जैवइंधनाच्या निर्यातीला विना अडथळा परवानगी द्यावी, अशी इच्छा अमेरिकन वाटाघाटीकर्त्यांना आहे. अमेरिकेसोबत व्यापार चर्चा सुरू करणाऱ्या काही प्रमुख पहिल्या देशांपैकी भारत एक आहे, जो लवकर करारासाठी दबाव आणत आहे.

अमेरिकेच्या वस्तूंवरील सर्व शुल्क रद्द करण्याची भारताने तयारी दर्शवली आहे, असे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी कतारमध्ये सांगितले. काही तासांनंतर भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या टिप्पण्यांचे खंडन केले आणि सांगितले की चर्चा अजूनही सुरू आहे. पुढील चर्चेसाठी वाणिज्य मंत्री पियुष गोयल या आठवड्याच्या शेवटी अमेरिकेत येणार आहेत. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने टिप्पणीसाठी केलेल्या विनंतीला प्रतिसाद दिला नाही. जैवइंधनांवरील नियमांसाठी जबाबदार असलेल्या तेल मंत्रालयानेही ईमेलद्वारे पाठवलेल्या प्रश्नांना उत्तर दिले नाही.

नॅशनल कॉर्न ग्रोअर्स असोसिएशनने ट्रम्प प्रशासनाला भारतासोबतच्या कोणत्याही व्यापार करारात इथेनॉल आणि डिस्टिलर ड्राय ग्रेन यांसारख्या मका आणि मका-आधारित उत्पादनांचा समावेश करावा, असे आवाहन केले आहे. ङ्गब्लूमबर्गफ्ने गेल्या महिन्यात दिलेल्या वृत्तानुसार, व्यापार चर्चेत कृषी उत्पादने, ई-कॉमर्स आणि डेटा स्टोरेजसह १९ क्षेत्रांचा समावेश असण्याची शक्यता आहे. तथापि, काहींनी असे म्हटले आहे की भारताने नियमांमध्ये कोणतीही शिथिलता केल्यास देशाचे ऊर्जा आयात बिल कमी करण्याच्या प्रयत्नांना धक्का बसू शकतो. त्यामुळे तो बाह्य देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहू शकतो आणि चढ-उतार होणाऱ्या बाजारपेठांच्या दयेवर राहू शकतो. जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा तेल खरेदीदार असलेल्या भारताने फेब्रुवारीमध्ये पेट्रोलमध्ये जवळजवळ २० टक्के मिश्रण मिळवले, जे २०३० च्या उद्दिष्टांपेक्षा पाच वर्षे पुढे आहे. इथेनॉल तयार करण्यासाठी उसाचा रस, मका, कुजलेले बटाटे आणि खराब झालेले अन्नधान्य यांसारख्या कच्च्या मालाच्या वापरावर भर दिला जात आहे. लोकांच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारही हरित इंधनाच्या अमर्यादित आयातीचा शेतकऱ्यांवर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंतित असण्याची शक्यता आहे. सरकार उत्पादकांना, एक शक्तिशाली मतदान गटाला, पाण्याची जास्त गरज असलेल्या पिकांपासून दूर जाण्यासाठी आणि इथेनॉलसाठी प्रमुख कच्चा माल असलेल्या मक्यासारख्या पर्यायांकडे जाण्यासाठी प्रोत्साहित करत आहे. दरम्यान, सरकारी मालकीच्या तेल शुद्धीकरण कारखान्यांना चिंता आहे की अमेरिका बाजारपेठ काबीज करण्यासाठी कमी दरात इथेनॉल विकू शकते, परंतु नंतर किंमती वाढवू शकते. तेल मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या चालू पुरवठा वर्षात इथेनॉल खरेदी गेल्यावर्षीच्या तुलनेत सुमारे ५० टक्के वाढवून १० अब्ज लिटर करण्याची योजना कंपन्यांनी तयार केली आहे.

पान १ वरुन

## यंदाच्या वर्षी नवीन महाविद्यालयाला मान्यता नाही

शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांच्या सद्यस्थिबाबतचे सादरीकरण अलीकडेच मुख्यमंत्र्यांना करण्यात आले. त्यात सन २०२२- २३ या शैक्षणिक वर्षात १५० हून अधिक महाविद्यालयात शून्य विद्यार्थी प्रवेश संख्येची नोंद झाली. तर ५६९ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी आढळून आली. २०२४-२५ या वर्षात यापेक्षा विदारक स्थिती असल्याची भीती व्यक्त होत आहे.

शून्य विद्यार्थी प्रवेश संख्या असलेल्या उच्च महाविद्यालयात सोलापूर आणि ठाणे जिल्ह्यातील प्रत्येकी १८ महाविद्यालयांचा समावेश आहे. त्या खालोखाल कोल्हापुरातील १०, अहिल्यानगर जिल्ह्यातील ९, नागपूरमधील८, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येकी ६ आणि शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील ५ महाविद्यालयांचा समावेश आहे. या महाविद्यालयात एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतला नसल्याचे आढळून आले. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आगामी शैक्षणिक वर्षात पदवीच्या कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी महाविद्यालयांना परवानगी न देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

## ठाकरे गटाकडून मोर्चेबांधणी राऊत आणि परब यांच्यावर अहिल्यानगरची जबाबदारी

आहे तर संजय राऊत यांच्यावर पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, मालेगाव, जळगाव शहराची जबाबदारी देण्यात आलेली आहे. अनिल परब, संजय राऊत धुळे आणि अहिल्यानगर, अनिल परब कल्याण-डोंबिवली, भास्कर जाधव नागपूर, चंद्रपूर, अनंत गीते यांच्याकडे उल्हासनगर, पनवेल शहर, अरविंद सावंत यांच्याकडे अमरावती अकोला, विनायक राऊत यांच्याकडे वसई-विरार शहर, भिवंडी, निजामपूर शहर, चंद्रकांत खैरे, अनिल देसाई, अंबादास दानवे यांच्यावर छत्रपती संभाजीनगरची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

## महाराष्ट्रातील ७ खासदार संसदरत्न

(भाजप), मदन राठौर (भाजप), सी. एन. अन्नादुराई (द्रविड मुनेत्र कळघम) आणि दिलीप सैकिया (भाजप) यांचा समावेश आहे. विभागीय संदर्भ असलेल्या वित्त आणि कृषी या दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदेमध्ये सादर केलेल्या अहवालांच्या आधारे पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे. वित्त समितीचे अध्यक्ष भर्तृहरि महताब, तर कृषी समितीचे अध्यक्ष काँग्रेसचे चरणजीत सिंह चन्नी आहेत.

## नगरसह १७ जिल्ह्यांत आठवडाभर 'अवकाळी' चा प्रभाव

विशेषतः सिंधुदुर्ग, रत्नागिरी, खान्देश, नाशिक,अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, नांदेड या १७ जिल्ह्यात चालू आठवड्यात वळवाच्या पावसाचा प्रभाव अधिक असण्याची शक्यता आहे. या पावसामुळे केवळ पेरणपूर्व शेतीच्या मशागतीचाच विचार व्हावा, असे वाटते. कपाशी व टोमॅटो लागवडी करु इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी पाण्याची व्यवस्था असेल तरच लागवडीचा विचार करावा, अन्यथा लागवडीवर विपरीत परिणामही होवू शकतो. राज्यात अद्याप मान्सून टप्प्यात आलेला नाही. त्याच्या सरासरी तारखेचा विचार केल्यास, महाराष्ट्रात येण्यास अजून २५ दिवसांचा कालावधी आहे आणि त्याच्या आगमनानंतर त्याची स्थिती काय असेल, याबाबत आताच भाष्य करणे घाईचे ठरेल, असे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी कळवले आहे.

## न्यायालयाच्या अटींचा भंग,कर्जदाराला दणका!

सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाचे वकील ॲड. एम. व्ही. दिवाणे यांनी उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिव्हीजन अर्जासंबंधी रोजनामाही सादर केला. त्यामध्ये कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हे लक्षात घेता, अगरवाल याने जामीन मिळाल्यानंतर अटींचा भंग केला असून, त्यांचे न्यायालयासमोरील वर्तनही योग्य नसल्याचे न्यायालयात नमूद केले. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने सुशिल अगरवाल याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याचा निर्णय दिला. या खटल्यात फिर्यादी व ठेवीदारांकडून ॲड. पिंगळे यांनी काम पाहिले.

## बनपिंप्रीत तरुणीचा खून करून मृतदेह पुरला

आला होता. या संदर्भात पोलीस उपनिरीक्षक मनोहर हनुमंत खिळदकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रविवारी (१८ मे) पहाटे कल्याण पठारे व त्याच्या साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण पठारे हा या हॉटेलचा चालक असल्याची माहिती आहे. खुनासाठी कोणते कारण होते हे अद्याप अस्पष्ट असून, संशयित आरोपीने आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने स्कॉर्पिओ (एमएच १६ एटी ६९७९) वाहनातून मृतदेह नेऊन शेतात पुरल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस चौकशी आणि शवविच्छेदन अहवालावरून हे प्रकरण खुनाचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर खुनाच्या गुन्ह्यात इतर सहभागी असलेल्या संशयितांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. कल्याण पठारे याने गुन्हा कबूल केल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. या प्रकरणामुळे बनपिंप्री परिसरात एकच खळबळ उडाली असून, प्रशांत हॉटेलमधील अवैध कृत्ये, विदेशी महिलांची तस्करी व त्यातून घडणारे गंभीर गुन्हे यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**हॉटेलमध्ये देहव्यापार**

बनपिंप्री येथील प्रशांत हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध देहव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळत आहे. केवळ परराज्यातून नव्हे, तर परदेशातून विशेषतः बांगलादेशमधून महिला या अवैध व्यवसायासाठी येथे आणल्या जात असल्याचे समोर आले आहे. नाशिकच्या दहशतवादविरोधी पथकाने मागील महिन्यात अशाच चार बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडे बनावट भारतीय आधार कार्ड सापडले होते. सध्या जी महिला मृतावस्थेत आढळली, ती देखील बांगलादेशी असावी असा पोलिसांना संशय आहे. यासंदर्भात अधिक तपास सुरू आहे.

## भारताचा बांगलादेशला दणका आयात नियम कडक

कोलकाता या दोन बंदरांमधूनच भारतात आयात करता येणार आहेत. हे कपडे कोणत्याही भूमी बंदरांमधून आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, फळांचे रस, कापूस, प्लास्टिक, आणि लाकडी फर्निचर यांसारख्या वस्तूंनाही केवळ विशिष्ट बंदरांमधूनच भारतात आणण्याची मुभा राहील. आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम आणि पश्चिम बंगालमधील काही चेकपोस्टवरून या वस्तूंची आयात करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**मासे, एलपीजीसह काही वस्तूंना सूट**

या नव्या निर्बंधांमध्ये काही आवश्यक वस्तूंना सूट देण्यात आली आहे. यामध्ये मासे, एलपीजी, खाद्यतेल यांचा समावेश आहे.

**नेपाळ व भूतानमार्गे जाणाऱ्या मालावर निर्बंध नाहीत**

बांगलादेशातून नेपाळ किंवा भूतानला भारताच्या मार्गे ट्रान्झिट होणाऱ्या मालावर हे निर्बंध लागू होणार नाहीत. म्हणजेच, जर बांगलादेशातील माल भारताच्या मार्गे या दोन देशांमध्ये पाठवायचा असेल, तर या नवीन बंदर-नियमांचे पालन करणे बंधनकारक राहणार नाही.

## जिल्ह्यात ३६६४ खते तर ३७३० बियाणे विक्री केंद्र

शासनमान्य अधिकृत बियाणे विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावे, त्या विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे, बियाण्याचे पाकीट किंवा पिशवी सीलबंद असल्याची खात्री करून घ्यावी, घरातील सातबाराधारकाच्या नावाने शक्यतो बियाणे खरेदी करावे, याशिवाय खते खरेदी करताना जमीन आरोग्य पत्रिकेनुसार व पिकाच्या गरजेनुसार खताची मात्रा ठरवून खते खरेदी करावे, खरेदीचे बिल पिकांचा हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे, संयुक्त खतांऐवजी सरळ खतांचा वापर करावा, कीटकनाशके खरेदी करताना एका वेळेस संपूर्ण फवारणीसाठी आवश्यक तेवढेच औषध खरेदी करावे, फवारणी करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी, कोणत्याही स्थितीत फेरीवाल्याकडून किंवा इतर अनधिकृत दुकानातून खते, बियाणे खरेदी करू नये, यातून फसवणूक होऊ शकते, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

जिल्ह्यात कृषी विभागाने मान्यता दिलेली ३ हजार ४६६ खासगी परवानाधारक कृषी केंद्र असून १६९ सहकारी संस्था व २९ शेतकरी गटाचे खते विक्री केंद्र आहेत. यासह बियाणांचे ३ हजार ५५८ विक्री केंद्र असून १७४ सहकारी संस्था तर २८ शेतकरी गटांना बियाणे विक्री करण्याची परवागनी कृषी विभागाच्यावतीने देण्यात आलेली आहे. यासह १ हजार ४३० कापूस विक्री केंद्र तर २ हजार ८१६ ठिकाणी कपाशी विक्री केंद्र सुरु असल्याचे कृषी विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

> शेतकरी बांधवांनी खते, बियाणे व कीटकनाशके खरेदी करत असताना सदर निविष्ठा परवानाधारक कृषी सेवा केंद्र विक्रेत्याकडूनच खरेदी कराव्यात, तसेच खरेदी केलेल्या निविष्ठांची पक्की बिले घ्यावीत. निविष्ठा खरेदी करत असताना लिंकिंग अथवा अन्य गैरप्रकार आढळून आल्यास नजीकच्या कृषी विभागाशी अथवा कृषी विभागाच्या टोल फ्री क्रमांकशी तात्काळ संपर्क साधावा. शेतकरी बांधवांना येणाऱ्या समस्येचे निराकरण तात्काळ करण्यात येईल.
>
> **–सुधीर शिंदे,** कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद